# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक १५३ वा ❑ भारतीय सौर दिनांक ०८ श्रावण शके १९४८, गुरूवार दि.३० जुलै २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

### विठ्ठलाचा निरोप आणि डोळ्यांतील चंद्रभागा: जातो माघारी पांडुरंग...

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

पंढरीची आषाढी वारी संपन्न होते आणि एकाएकी पंढरपूरच्या अथांग गर्दीला एक गूढ, शांत भरती येते. ही भरती केवळ माणसांची नसते, तर ती असते भावनांची, एका अनामिक हुरहुरीची आणि जड अंतःकरणाची. विठ्ठलाच्या दर्शनाची आस घेऊन शेकडो मैलांची पायपीट करणारी पावले जेव्हा परतीच्या प्रवासाला निघतात, तेव्हा मुखातून एकच आर्त हाक उमटते, जातो माघारी पांडुरंग..! हा नुसता निरोप नाही, तर एका लेकराचे आपल्या माऊलीपासून दूर जाण्याचे आक्रंदन आहे. डोळ्यांतून वाहणारे पाणी आणि जड झालेले पाय, वारी नावाच्या या महासोहळ्याची खरी गोडी आणि त्याचे मर्म जगाला पटवून देत असतात. ज्या पायपिटीत आनंद होता, तिथे आता एक हुरहूर दाटून येते आणि प्रत्येक पाऊल जड होऊ लागते.कपाळावरचा बुक्का घामानं पुसला गेला तरी मनावरचा विठ्ठल-रंग पुसता येत नाही. परतीची पावलं निघतात खरी, पण ती जड झालेली असतात. शंभर वर्षांच्या आजोबांच्या थरथरणाऱ्या हातांना आता काठीचा आधार घेताना विठ्ठलाच्या हाताची उणीव भासू लागते. वारीच्या स्वातंत्र्यात हुंदडणारी ती लहान मुलं अचानक मोठी झाल्यासारखी शांत होतात. चालताना सोबत लाभलेले ते अनोळखी, वेगवेगळ्या जाती-धर्माचे सख्खे भाऊ-बहीण आता आपापल्या वाटांनी विलग होऊ लागतात, तेव्हा गळा दाटून येतो.

शेकडो किलोमीटर ऊन, वारा, पाऊस अंगावर झेलत, पायाला पडलेले फोड विसरत वारकरी पंढरीत दाखल होतो. चंद्रभागेत स्नान करून विठूरायाच्या कळसाचे किंवा चरणाचे दर्शन घेताच प्रवासाचा सगळा शीण एका क्षणात नाहीसा होतो. वारीतल्या त्या रिंगण सोहळ्याचा थरार, रात्रीच्या कीर्तनात हरवून गेलेलं भान आणि वाळवंटात विठ्ठलाच्या नामाच्या गजरात घेतलेली सुखाची विश्रांती... हे सगळं अनुभवल्यानंतर अचानक एक दिवस परतीची घंटा वाजते आणि खऱ्या परीक्षेची वेळ सुरू होते. वारीचा हा परतीचा प्रवास अत्यंत भावुक असतो. पंढरीच्या वेशीवरून बाहेर पडताना प्रत्येक वारकऱ्याची अवस्था एका सासुरवाशिणीसारखी होते. डोळे भरून विठ्ठलाची सावळ्या रंगाची मूर्ती, तो कटेवर ठेवलेला हात मनात साठवून घ्यायचा असतो, पण जितकी मूर्ती मनात साठवावी, तितके डोळे जास्त पाणावतात. वारकऱ्याची अवस्था अशी होते की, देह घराकडे निघतो खरा, पण मन मात्र विठ्ठलाच्या गाभाऱ्यातच गहाण पडलेले असते.

सोशल मीडियावर फिरणारा तो वारकऱ्यांच्या डोळ्यांतील पाण्याचा व्हिडिओ केवळ एक डिजिटल क्लिप नाही, तर तो एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित होणाऱ्या निस्सीम भक्तीचा जिवंत दस्तऐवज आहे. त्या आसवांमध्ये वारीचा संपूर्ण प्रवास दडलेला असतो. प्रपंचाची सगळी सुख-दुःखं वेशीवर टांगून, फक्त त्या एका सावळ्या विठ्ठलासाठी मैलोनमैल चालणाऱ्या या माणसाला निरोपाच्या क्षणी जे दुःख होतं, ते शब्दात पकडणं कोणत्याही लेखकाला किंवा कवीला कधीच जमणार नाही. त्या डोळ्यांतील पाण्याला कृतज्ञता, विरह आणि पुढच्या वारीची आस असे अनेक पदर असतात. वारी काय असते, हे समजून घेण्यासाठी कोणत्याही ग्रंथाची किंवा गहन तत्त्वज्ञानाची गरज नाही. निरोपाच्या वेळी एखाद्या वृद्ध वारकऱ्याच्या सुरकुतलेल्या गालावरून वाहणारा पाण्याचा एक थेंब जरी पाहिला, तरी वारीचं महात्म्य डोळ्यांसमोर उभं राहतं आणि ती आसवे चंद्रभागेच्या पाण्यापेक्षाही पवित्र वाटू लागतात.

या वारीच्या वाटेवर मानवी समतेचे आणि अथांग भक्तीचे जे विश्व उभे राहते, ते केवळ अद्भूत असते. शंभर वर्षांचे झुकलेले आजोबा हातातील काठीच्या आधाराने तरुणालाही लाजवेल अशा उत्साहाने विठ्ठलाकडे पावले टाकत असतात, तर दुसरीकडे अपंग व्यक्ती सर्व शारीरिक मर्यादांवर मात करत, कधी कुबड्यांच्या तर कधी व्हीलचेअरच्या साहाय्याने केवळ विठूरायाच्या ओढीने पंढरीची वाट तुडवत राहतात. बोबडे बोल बोलणारी लहान मुलं वडिलांच्या खांद्यावर बसून टाळ्या वाजवत माऊलीचा गजर करतात. इथे ना वयाचे बंधन असते, ना शरीराच्या व्याधींचे. अनेक जाती-धर्माचे लोक, आबालवृद्ध, स्त्री आणि पुरुष एकत्र येतात, तेव्हा समाजमनावरील भेदभावाचे सगळे पापुद्रे गळून पडतात. वर्षभर पाठीवर असणारे प्रपंचाचे ओझे, गरिबीची चिंता, शेतीची काळजी, रोजची सुख-दुःखे हे सगळे काही विसरून ही अफाट जनमेदिनी विठ्ठल भक्तीच्या एकाच रंगात न्हाऊन निघते. वारीच्या या प्रवासात त्यांना एका वेगळ्याच आध्यात्मिक स्वातंत्र्याचा अनुभव येतो; जिथे ना कोणती भीती असते, ना कोणती विवंचना. हे असे स्वातंत्र्य असते जे माणसाला स्वतःच्या देहापलीकडे जाऊन जगण्याची अनुभूती देते. पण हा आनंदाचा, समतेचा आणि स्वातंत्र्याचा सोहळा जेव्हा संपतो, तेव्हा त्याहूनही मोठे विरहाचे दुःख उभे राहते. वारी संपून जेव्हा माघारी फिरण्याची वेळ येते, तेव्हा प्रत्येकाचे अंतःकरण जड होते. तो शंभर वर्षांचा वृद्ध असो, तो अपंग भाऊ असो, ती माऊली असो वा ते लहान मूल असो, निघताना सगळ्यांचे डोळे वेळी पाणावतात. तो विरह, ती ताटातूट अतिशय वेदनादायी असते, कारण पांडुरंगाच्या ओढीने चाललेली वाट माघारी फिरते. पाऊले जड होतात, अंतःकरण भरून येते. विठ्ठलाच्या वारीत अनुभवलेले ते निखळ स्वातंत्र्य सोडून पुन्हा एकदा प्रपंचाच्या त्याच चक्रव्यूहात आणि मानवनिर्मित चौकटीत परतायचे असते, याच जाणिवेने वारकऱ्याचा कंठ दाटून येतो. पंढरीचा सोहळा आटोपतो, विठ्ठलाची पाऊले डोळ्यांत साठवून झाली की, एक अनामिक हुरहूर काळजात घर करू लागते. वारी संपल्याची ती अधिकृत घोषणा म्हणजे जणू काळजावर झालेला सुबक घाव असतो. कालपर्यंत जे पंढरपूर लाखो वैष्णवांच्या सुरांनी, टाळांच्या गजराने आणि माऊली शब्दाच्या मायेने ओसंडून वाहत होतं, तिथे आता एक स्तब्धता पसरू लागते. चंद्रभागेचा तीर साक्ष असतो त्या मुक्या निरोपाचा.

# सावित्री जगदाळे यांना रघुनाथ बोरसे बालवाङ्.मय पुरस्कार

ज्योतिर्मय साहित्य

छत्रपती संभाजीनगर - मराठवाडा साहित्य परिषदेच्या वतीने गेल्या वर्षापासून देण्यात येणारा रघुनाथ शिवराम बोरसे बालकुमार वाङ्.मय पुरस्कार यंदा साताऱ्याच्या बालकुमार साहित्यिक सावित्री जगदाळे यांना देण्यात यावा, असा निर्णय मराठवाडा साहित्य परिषदेच्या पुरस्कार निवड समितीने घेतला असून, हा पुरस्कार त्यांना २६ ऑगस्ट रोजी संध्याकाळी ६ वाजता साहित्य अकादमी बाल साहित्य पुरस्कार विजेते लेखक आबा महाजन (तहसीलदार, येवला) यांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे.

सावित्री जगदाळे ह्या कोरेगाव तालुक्यातील कुमठ्यासारख्या खेडेगावातून आलेल्या बालसाहित्यिक असून, गेल्या तीस वर्षांपासून बालसाहित्याचे लेखन करीत आहेत. त्यांची बालकुमार वाङ्.मयाच्या क्षेत्रात कथा, कादंबरी, कविता या प्रकारांत एकूण सोळा पुस्तके प्रकाशित झालेली आहेत. उजळपरी, दुधाच्या मिशा, आजोपिझ्झा, स्पायडरमॅन ह्या बालकादंबऱ्या. गोगलगाईचे पंख हा बालकवितासंग्रह आणि सफर मंगळावरची हा बालकथासंग्रह ही त्यांची गाजलेली पुस्तके. त्यांच्या बालकादंबऱ्यांना महाराष्ट्र शासनासह बालसाहित्याचे अमरेंद्र भास्कर बालकुमार साहित्य संस्थेचा पुरस्कार, महाराष्ट्र साहित्य परिषदेचा पुरस्कार, ए. पा. रेंदाळकर पुरस्कार, नांदेड



येथील केवलबाई पुरस्कार, साताऱ्याचा अक्षरगौरव पुरस्कार, मराठवाडा साहित्य परिषदेच्या उदगीर शाखेचा पुरस्कार असे अनेक पुरस्कार त्यांना मिळालेले आहेत.

श्रीमती सावित्री जगदाळे ह्या स्वत: बालवाङ्मयाच्या चळवळीत सक्रिय असून, त्यांनी बालवाङ्.मयाच्या प्रसारासाठी कुंडल प्रतिष्ठान या नावाची संस्था निर्माण केली आहे. या प्रतिष्ठानच्या वतीने त्या दरवर्षी विविध उपक्रम आयोजित करीत असतात व विविध वाङ्.मय प्रकारांतील लेखनाला व्यापक प्रसिद्धी देऊन पुरस्कार देत असतात. शिवाय शाळाशाळांमध्ये कथा-काव्य वाचनाद्वारे बालकुमारांवर वाङ्.मयाचे संस्कार करण्याचे व वाचक चळवळीचा प्रसार करण्याचे काम करीत असतात.

मराठवाडा साहित्य परिषदेच्या २०२६ च्या रघुनाथ शिवराम बोरसे पुरस्काराची निवड करण्यासाठी प्राचार्य कौतिकराव ठाले पाटील यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त समितीने त्यांच्या बालवाङ्.मय क्षेत्रातील ह्या सर्वांगीण कामाची दखल घेऊन या पुरस्कारासाठी त्यांची निवड केली आहे. निवड समितीत डॉ. दादा गोरे, डॉ. हंसराज जाधव हे अन्य दोन सदस्य होते.


मराठवाडा साहित्य परिषदेचे अध्यक्ष प्राचार्य कौतिकराव ठाले पाटील यांनी आज या पुरस्काराची घोषणा केली. यावेळी परिषदेचे उपाध्यक्ष डॉ. आसाराम लोमटे व रामचंद्र तिरुके हे आणि कार्यवाह डॉ. दादा गोरे, कोषाध्यक्ष डॉ. रामचंद्र काळुंखे, सहकार्यवाह डॉ. गणेश मोहिते व डॉ. दीपा क्षीरसागर हे उपस्थित होते.

# वाचन कट्टा

ज्योतिर्मय साहित्य

''वाचन'' किती गहण अर्थ व मार्मिकता आहे या शब्दात. खरंच, शिवाय वाचणाच्या माणूस अधुरा व अपुराच आहे. जोपर्यंत आपण विविध प्रकारच्या वाचनातून काही ज्ञानबोध, माहिती, अनुभव घेत नाही तोपर्यंत आयुष्याचे गणित हे साधे व सोपे वाटायला लागते. पण, जेव्हा आपण वाचनाची सवय अंगीकारतो तेव्हा जीवनाचा अर्थ, येणारे अनुभव खूप मोठे व सुंदर वाटायला लागतात. आपल्या महाराष्ट्रियन मराठी साहित्यात नानाविध प्रकारचे ग्रंथ, कथा, कविता, कादंबऱ्या, चारोळ्या, साहित्य, पुस्तके आहेत. या साहित्य वाचनामुळे आपण आपला वैचारिक, बौद्धिक, भावनिक विकास सर्वांगीणरित्या करून घेत असतो. हे आहे वाचन जे माणसाला परिपूर्णरित्या घडविते.

''वाचन कट्टा'' म्हणजे वाचन करण्यासाठीची एक विशिष्ट नेमलेली जागा. जसे की, शाळा, शाळेतील मैदान, कॉलेज एखादी मोकळी जागा, मोठा वर्ग, वाचनालय ई. ठिकाणी जिथे लोक एकत्र येऊन पुस्तके वाचून त्यावर सामूहिक चर्चा करतात. खरे




तर वाचन कट्टा असे उपक्रम विद्यार्थी-शिक्षक, व बाकी वाचनाची आवड असणाऱ्यांसाठी राबविले जातात. वाचन कट्टा म्हणजे वाचनातून व सामूहिक चर्चेतून एकमेकांना दिले जाणारे प्रोत्साहन होय. यामुळे वाचनाची आवड अधिकाधिक वाढते. ज्यातून पुस्तकांवर चर्चा करून आपण आपापली मते, आपापले विचार व भावना व्यक्त करू शकतो.

वाचन कट्टा म्हटलं की नानाविध प्रकारची पुस्तके, वाचनालय आणि सामूहिक चर्चेमुळे वाचन प्रक्रियेला प्रचंड असे उधान येते. ज्यामुळे साहित्यावरील प्रेम व साहित्याची आवड अधिकाधिक वाढते. तसेच पुस्तके, लेखक, कवी, कादंबरीकार या सर्व गोष्टींची खूप जवळून ओळख व माहिती मिळते. वाचन कट्ट्यावर वाचन करणारे सर्व एकत्र येऊन विद्यार्थी व शिक्षक वाचलेल्या पुस्तकांवर चर्चा करतात आणि चर्चेमुळे नव्या विचारांची निर्मिती होते. व तसेच सुसंवादाची प्रक्रिया वाढीस लागते. व एकमेकांकडून एकमेकांकडे नव-नवीन विचारांची देवाण-घेवाण केली जाते.

वाचन कट्टयात निवडक पुस्तकांची निवड केली जाते. जी प्रत्येकांच्या अभिरुचीनुसार निवडली जातात. पुस्तके वाचनाने ज्ञान वाढते. वाचन कट्ट्याच्या निमित्ताने आज विविध प्रकारचे उपक्रम व कार्यक्रम राबविले जात आहेत. वाचन कट्ट्यात लेखकांचा, विविध पुस्तकांची प्रदर्शने भरवून जन-मानसांपर्यंत वाचन कट्ट्यांचे महत्त्व पोहोचविले जात आहे. एकंदरीत वाचन कट्यामुळे वाचन संस्कृतीचे जतन व वाचन संस्कृतीचा जो पाया आहे तो पाया मजबूत करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

वाचन कट्या साठी एखादा आठवडा ठरवला जातो. त्यात जमलेल्या लोकांना विषय दिले जातात. व त्या-त्या विषयावर सखोल माहिती इतरांपर्यंत पोहोचवली जाते. शाळेमध्ये किंवा कॉलेजमध्ये वाचन कट्याचे आयोजन करण्याचे कारण, विद्यार्थ्यांना वाचनाची सवय, वाचनाची अभिरुची विद्यार्थ्यांमध्ये निर्माण व्हावी. तसेच एखादा विषय घेऊन विध्यार्थी त्या विषयाची सखोल माहिती काढून सर्वांना तो विषय समजावून सांगू शकतील. यासाठी वाचन कट्याचे आयोजन केले जाते. यामध्ये नानाविध प्रकारचे विषय असतात भौगोलिक, सामाजिक, ऐतिहासिक, वैज्ञानिक, मराठी साहित्य ई. या सर्व विषयांवर स्वतः सखोल माहिती घेऊन तो विषय सर्वांसमोर मांडण्यास सांगितला जातो. मग तो विषय सविस्तर रित्या सर्वांसमोर मांडून त्याची माहिती दिली जाते. प्रत्येकाने घेतलेला वेगवेगळा विषय व त्यातील सगळी माहिती सगळ्यांपर्यंत पोहोचवली जाते व त्यातून विविध प्रकारचे ज्ञान इतरांना दिले जाते.








कोणतीही जाहिरात फक्त 100 रुपयात*

ज्योतिर्मय मध्ये जाहिरात द्या आणि आपला व्यवसाय लाखों लोकांपर्यंत पोहोचवा. ◾ दररोज 70000 सुजाण वाचक वाचतात. ♦ फक्त दर्जेदार साहित्यावर चालणारे महाराष्ट्रातील अग्रगण्य मराठी E दैनिक. ◾ नवोदित साहित्यिकांचे हक्काचे व्यासपीठ ♦ सर्वसमावेशक साहित्याचा खजिना ◾ गूगलवर पेपर वाचण्यासाठी कोणतेही मूल्य नाही. ♦ कोणीही नवोदित साहित्यिक 500 रु. भरून वर्षभर सहभागी होऊ शकतो. ♦ संपर्क : 7743918559 (for Calling, whatsapp, online payment ) (*नियम लागू )

Paper link : www.jyotirmaysahitya.com




# जात्यावरच्या ओव्या......

पांडुरंग पंढरीचा
काय शिकवतो?
समतेच, ममतेच
ध्यान करवून देतो || ७६८||

पांडुरंग पंढरीचा
दळतो जात्याच दळण
जनाबाईच्या संगति
गातो आपल भजन ||७६९||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

# मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग ५७




ज्योतिर्मय साहित्य

संतांजवळ प्रत्येक गोष्टीत देव पाहण्याची जी दृष्टी असते, ती विकसित व्हावी लागते आणि ती संस्कारानेच विकसित होते. म्हणून नामस्मरण, त्यासोबतच कृती आणि उपासना यांच्या माध्यमातून परमेश्वराचे ध्यान करावे. भोवतालच्या परिस्थितीमुळे मनात नाना प्रकारचे विकल्प किंवा शंका येतात. खरा भक्त अशा कोणत्याच गोष्टीकडे लक्ष न देता मनापासून भगवंताची उपासना करतो. म्हणूनच त्याच्यावर उपासनेत मोकळेपणा असतो.



भक्ताने उदासीन असावे असे समर्थ जे म्हणतात त्याचा अर्थ समजून घेणे महत्त्वाचे आहे. उदासीन हा शब्द इंद्रियांच्या बाबतीत वापरला गेला आहे. म्हणजे आपले मन जे सतत विषयांकडे ओढ घेते ती आवरणे, आणि विषयांच्या बाबतीत विरक्त राहणे म्हणजेच उदासीन राहणे होय. थोडक्यात म्हणजे विषयांच्या बाबतीत आपली वृत्ती उदासीन असली पाहिजे. भोवतालच्या परिस्थितीबद्दल नाही. आपण प्रापंचिक माणसे आहोत म्हणून आपल्या सभोवताली घडणाऱ्या घटना मग त्या अनुकूल किंवा प्रतिकूल असो, त्या संबंधात आपल्याला त्यांची योग्य ती दखल घेऊन वागावे लागेल. आपले जे कर्तव्य आहे त्याबाबत सजग राहावे लागेल. म्हणजेच त्या बाबतीतली उदासीनता कामाची नाही. आपल्याला प्रपंचात राहून परमार्थ साधायचा आहे. तेव्हा जी उदासीनता आहे ती विकारांबद्दल असावी. अशा प्रकारची सवय एकदा आपल्या मनाला लागली की मग भगवंताची मोकळेपणाने आपण उपासना करू शकू.

आपल्यासारख्या सामान्य माणूस अनेक गोष्टींना आणि विषयांना मनाने बांधला गेलेला असतो आपण जोपर्यंत ही बंधने तोडत नाही तोपर्यंत खऱ्या अर्थाने भगवंताचे होऊ शकत नाही किंवा त्याच्याजवळ जाऊ शकत नाही. मनाने प्रपंचाचा संग टाकावा आणि भगवंताचा संग जोडावा. मग खरोखरच भगवंताचे धन्य भक्त होण्यासाठी आपण पात्र होऊ.

स्वसंवाद : १) माझी उपासना ''नित्यनेमाने'' होते का ? मी सुखात किंवा दुःखात असताना सुद्धा ?

२) ''सामान्य माणसाला देवात विषय दिसतो'' माझ्या उपासनेत माझे खरोखर देवाकडे लक्ष असते का की मनात इतर विचारच जास्त असतात ?

३) विकारांबद्दल उदासीन आणि कर्तव्याबद्दल सजग या दोन्ही गोष्टींचा समतोल माझ्या जीवनात आहे का ?

(क्रमशः)



# || अभंग-माधव ||

माधव मनोहर जोशी
दादर, मुंबई.
मो. 9833159630



--------- गुरुपौर्णिमा ----------

गुरु देतो शक्ती | शिकवितो भक्ती |
अशी थोर व्यक्ती | शोधू कुठे ||१||
गुरु पद स्पर्श | होताच जीवास |
वाटतो उल्हास | अमोलिक ||२||
गुरु म्हणू कोणा | काही समजेना |
काय झाले मना | खिन्न झालो ||३||
मग उमजले | मज आपोआप |
माय अन् बाप | वंदनीय ||४||
आई माझा गुरु | बाप माझा गुरु |
कैसे त्यां विसरू | समजेना ||५||
त्यांचे उपकार | ह्या जन्मी फिटेना |
वंदितो मी त्यांना | सदोदित ||६||
माधव हा म्हणे | बाप अन् माय |
श्रेष्ठ गुरु होय | वंदू त्यांना ||७||

# || संजय उवाच... ||




@संजय काव्या पुणे 7743918559

प्रेम
प्रेम हे सर्वात मोठे सुखाचे स्रोत आहे, यापेक्षा मोठा आनंद काहीही नाही. प्रत्येकाने प्रेम करावे, प्रेमाने सर्व साध्य होते फक्त अंतःकरण शुद्ध पाहिजे. त्यामागे कोणताही स्वार्थ नको.

(हे माझे मत आहे पटले तर घ्यावे)

# सत्पुरुष व त्यांचा अनुग्रह



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

सत्पुरुषाचा अनुग्रह झाला म्हणजे त्या व्यक्तीच्या प्रापंचिक आणि पारमार्थिक बाबतीत त्या सत्पुरुषाचीच सत्ता असते. सरकारच्या हातात सर्व सत्ता असते, आणि राज्ययंत्र सुरळीत चालण्याकरिता एकेका खात्याकडे एकेक कामगिरी सोपविलेली असते. कायद्याला धरून जोपर्यंत ते खाते आपले काम करीत असते, तोपर्यंत सरकार त्यात ढवळाढवळ करीत नाही. फक्त क्वचित् प्रसंगी आणि विशेष कारणामुळेच, हस्तक्षेप करून सरकार आपल्या सत्तेचा उपयोग करते, आणि इच्छेप्रमाणे गोष्टी घडवून आणते. तोच नियम इथेही लागू आहे. प्रापंचिक बाबतीत प्रारब्ध हे एक खाते आहे, त्याचा संबंध देहापुरताच असतो. प्रत्येकाच्या प्रारब्धानुसार त्याला बऱ्यावाईट गोष्टी भोगाव्या लागतात. सत्पुरुष होता होईल त्यांत ढवळाढवळ करीत नाही. फक्त व्यक्तीच्या कल्याणाकरिताच जर जरूर असेल, तर सत्पुरुष त्यात ढवळाढवळ करील. पण परमार्थाच्या बाबतीत त्याची सर्व सत्ता असते. आपण मात्र त्याने सांगितलेल्या साधनात राहून, त्याला त्याची कामगिरी करण्यात अडथळा न येईल असे वागणे जरूर असते. हा अडथळा अनेक प्रकारचा असतो. एक म्हणजे, त्याने सांगितलेल्या साधनाबद्दल शंका घेणे; दुसरे, दुसऱ्याला अमुक एक दिवसात साधले, मला अजून का साधत नाही, असा विचार मनात येणे; आणि तिसरे, सांगितलेल्या साधनापेक्षा काही अधिक किंवा कमी करण्याचा प्रयत्न करणे. थोडक्यात म्हणजे, एकदा संताच्या पायावर डोके ठेवल्यावर, आपला प्रपंच आणि परमार्थ ही दोन्ही त्याच्याकडे सोपवून, प्रपंचात घडणाऱ्या गोष्टी त्याच्याच इच्छेने घडताहेत अशी भावना ठेवून, आपले कर्तव्य करीत, त्याने सांगितलेल्या साधनात एकनिष्ठेने राहणे, हाच खरा मार्ग आहे.

संताच्या देहाकडे पाहण्याचे कारण नाही; त्याचा देह आमचे काम करीतच नाही. तो परमात्मस्वरूप आहे ही जी आपली भावना, ती आपले काम करते. संत अत्यंत दयाळू असतात. सत्पुरुषाला भगवंत भेटलेला असतो. म्हणून, सत्पुरुष हा देहाने या जगात राहतो असे दिसले, तरी अंतर्यामी तो भगवंतापाशीच असतो. म्हणून आपण सत्पुरुषाकडे जात असताना या जगातल्या वस्तूविषयी वासना धरून गेलो, तर ते योग्य नव्हे. सत्पुरुषाला त्याच्या लक्षणांवरून ओळखता येणार नाही. पुस्तकामध्ये दिलेली जी लक्षणे असतात, त्यांच्या पलीकडे संत असतो. त्याला ओळखायला आपल्या अंगी थोडे तरी भगवंताचे प्रेम आवश्यक आहे. भगवंताचे प्रेम हे एक मोठे वेड आहे. जे ज्याला लागेल तो भाग्याचा खरा !

भगवंताच्या दास्यात जे प्रेम आहे ते जगाच्या मालकीत नाही.

# || अध्यात्म ||

मधुकर बोरीकर,
पुणे

## वारीतील आनंद

पुढे....

क्षेत्र पंढरपुरास निघालेला भाविक मनुष्य नामस्मरण करीत वाटेने चालला असता, त्याच्या चालण्या मध्ये पावलो पावली यज्ञ घडत असतात व त्या यज्ञा पासून होणारी पुण्याई त्यास मिळत असते. त्यामुळे वैकुंठ प्राप्तीचा मार्ग त्यास सुलभ होतो. जप तप अनुष्ठान क्रिया कर्म धर्म हे सर्व पांडुरंग आहे असे साधु संत जाणतात. सत्संगा मुळे भक्ति मार्गाची वाट सुरू होते व त्यास ब्रह्मानंद प्राप्तीचा सुकाळ होतो. विना टाळ मृदंग गरुड टके घेऊ नये वैष्णवांचा मेळा पंढरपूर क्षेत्रामध्ये आनंदाने भगवत नामाचा गजर करीत असतो. हा आनंद स्वर्गातील इंद्रादीक देवांनाही दुर्लभ आहे. म्हणून हे देव पंढरपूर क्षेत्रात वृक्ष होऊन राहिलेले आहेत. सनकादिक मुनी पंढरपूर क्षेत्रात ध्यान करीत बसले आहेत. भगवत नामाचा महिमा ब्रह्मदेवाला देखील कळणे कठीण आहे. पंढरपूरची वारी एक तांत्रिक क्रिया म्हणून करून चालणार नाही. वर पांगी भक्ती करूनही चालणार नाही. रस्त्यात खायला मिळणाऱ्या मिष्टान्ना कडे नजर असणाऱ्याला नाही. या वारीचा तसा लाभ मिळणार नाही. ही वारी करताना काय मनात असावे, याविषयी माऊली खालील मत व्यक्त करतात.

(क्रमशः)

# सुख दुःखाचे तरंग माणसा-माणसाचे



वसंत कुलकर्णी,
छ.संभाजीनगर,
मो. 96730 67194

## ग्रामीण संस्कृती आणि शहरीकरणाचा संगम

आज आपण 21 व्या शतकात जीवन जगतोय, ज्यात ए.आय पासून डिजिटल क्रांती, सर्व गोष्टींत बदल, सर्व क्षेत्रात बदल होत आहे... मित्रांनो मला इथं तुलना करायची नाही,तर ग्रामीण व शहरी (जी आज टू थ्री टायरची) यात बदल, त्यांचा नवाजुना संघर्ष, तंत्रज्ञानाचा परिणाम फक्त अधोरेखित करणे आहे. तर बघा आज शहरात सिमेंटच्या जंगलात जणू सगळे धापा टाकत जगताहेत; कोरडे शब्द, तकलादू नाती शिकवत जणू धडपड करत आहेत. शेजारी कोण रहाते हे कित्येक वर्षे माहित नसतं!तर दुसरीकडे गावकुसाबाहेर आपली एक ग्रामीण संस्कृती, माती माणूसकी आणि धार्मिकते मधे तग धरून आहे, शहरा सारखी ही डिझीटल गॅझेट व साधनात नाही तर ती माणसाच्या रोजच्या वागण्यात,रांगड्या-भिडस्त स्वभावात आहे! शहरात नात्याचा गोतावळा नसलेली मुलं,आभासी जगात वावरणारी माणसं, त्यांची कामही तसीच, स्री-पुरूष पेहराव, शुष्क भावविश्व असे घड्याळा - कडे पहात काट्यावर जीवन चालतं!तर संतपरंपरेचा प्रभाव ग्रामीण भागात आजही आहे. एका ते तुका चे संस्कार व आध्यात्मिकयामुळे नैतिक मुल्ये,संयम परस्पर आदर आहे. विकास व प्रगतीसाठी गावागावात आधुनिक सुविधाही आल्या आहेत... म्हणून पारंपारिक मुल्ये आणि विकास यांच्या सुदंर संगमाने गावे समृद्ध झाली. शहरे म्हणजे भौतिक प्रगतीची प्रतिके. पण ती भौतिकता आता शहरापुरती राहिली तरी कुठे?लोकल टू ग्लोबल व ग्लोबल टू लोकल झाली. व तंत्रज्ञान विकसित झाल्याने बदल होऊन श्रीमंती आणि भौतिकततेची व्याख्या बदलत आहे. आपणही थोड थांबून वाट पाहू.अवघा रंग एक झाला असा अनुभव येईल.बस आज एवढं पुरे स्वस्थ राहा मस्त राहा सुख दुःखाचे तरंग माणसा-माणसाचे वाचत राहा. गूड़ डे व्हेरी गूड़ मार्निंग आणि ईथे थांबतो

# || श्री दत्त महिमा ||



लेखन सेवा - योगीराज (नितीन) डोळे
आद्यपीठ वरद दत्त संस्थान
श्री क्षेत्र राक्षसभुवन ता.गेवराई जि. बीड



## अवधूतन श्री गुरुदेव दत्त

ज्योतिर्मय साहित्य

पूर्वीच्या लेखात आपण आद्यपीठ वरद संस्थान आपल्याला प्रथमच ज्ञात झाले असावे.

या स्थानाची पूर्वपिठीका आपण पाहिली आहे. आता त्या दत्तस्थानाची माहिती दत्तभक्तांना व्हावी यासाठी हा लेखन प्रपंच

आद्यपीठ श्री वरद दत्त संस्थान हे गोदावरी नदीच्या तीरावरील एक सुंदर दत्तस्थान आहे पवित्र पापनाशिनी मोक्षदायिनी गौतम ऋषींनी पृथ्वीवर अवतरीत केलेली अशी नदी ज्यास गौतमी असे प्राचीन काळी नाव होते सांप्रत काळी ती गोदावरी नावाने प्रख्यात आहे तिच्या या पवित्र सहवासामुळे हा परिसर रमणीय झाला आहे

या दत्त स्थानावर दगडी बांधकाम असलेले एक सुंदर मंदिर आहे याचे वैशिष्ट्य असे की मंदिर आहे पण यास शिखर नाही कारण अत्री अनसूया यांचे आश्रमाचा स्थान असल्याने रचना आश्रमाप्रमाणे आहे या स्थानी खोल भुयारसदृश गर्भगृह मध्ये वालुके पासून बनलेली एकमुखी वरद दत्त आहे

सभोवताली संस्थानच्या पूर्वसुरी सत्पुरुषांच्या समाधीस्थळी आहेत मुख्य मूर्ती एकमुखी षटभुज अर्थात सहा हात असलेली सर्व आयुधा सह जसे शंख चक्र डमरू त्रिशूल माला व कमांडलू अशा सहा उपकरणासह उजवे पाऊल किंचित पुढे असलेली तत्पर चरण अशी दत्तमूर्ती विराजित आहे

ज्या काळात धातू किंवा संगमरवर याद्वारे मूर्ती बनवली जात नसे त्याकाळी उपलब्ध साधन वालुका पासून ही मूर्ती निर्मित आहे

साधारणतः ११०० वर्षा पासून श्री दत्तमूर्ती त्रिमूर्ती असल्याचे जाणवते त्यापूर्वी च्या दत्तमूर्ती एकमुखीच होत्या दत्तभक्त संत एकनाथ सर्वज्ञ दासोपंत यांचे आराध्य एकमुखी दत्तात्रेय असल्याचे दिसते ज्या ज्या दत्तभक्तांना दत्तात्रेय यांनी प्रत्यक्ष दर्शन दिले ते सर्व एकमुखीच होते नंतरच्या काळात चित्रकार शिल्पकार यांच्या कल्पनेतून तीन मुखी दत्तात्रयांची स्थापना झाली असे आढळते दत्त महाराजांच्या वरील दोन्ही हातामध्ये शंख व चक्र मधील दोन्ही हातामध्ये डमरू व त्रिशूल आहे व खालील दोन्ही हातामध्ये माला व कमंडलु आहेत. अशी ही सुंदर मूर्ती खोल गाभाऱ्यामध्ये विराजित आहे अशी ही भारतातील सर्वात प्राचीन मूर्ती वरद दत्त म्हणून प्रख्यात आहे या गर्भगृहाचे वैशिष्ट्य असे की उन्हाळ्यामध्ये या ठिकाणी थंडावा असतो व हिवाळ्यामध्ये आतील वातावरण उबदार असते ही रचना भाविकाना सुखावून जाते. यामुळे प्राचीन वास्तूकले चा सुंदर अविष्कार आपणास निश्चित भुरळ घालतो याच दत्त मूर्तीच्या वरील भागात एक दुर्मिळ असे त्रिस्तरीय दत्त यंत्र स्थापित आहे श्री वरद दत्त मूर्तीच्या खालच्या बाजूस संस्थांचे मूळ पुरुष दत्ता स्वामी उर्फ भाऊ स्वामी यांच्या चरण पादुका आहेत त्यांची अशी इच्छा होती की दत्त चरणांचे तीर्थ माझ्या मस्तकी नित्य पडावेत याच मंदिराच्या लगत उत्तरेस एक शिवलिंग ज्याच्या वर एक शिलालेख आहे व बाजूला संस्थांचे द्वितीय सदपुरुष सद्गुरु बाबा स्वामी महाराज यांची समाधी आहे ती पण खोल भुयारात आहे या समाधीच्या उत्तरेस एक सोमेश्वर मंदिर आहे

या स्थानाचे वैशिष्ट्य असे की शिवलिंग आहे मात्र समोर अथवा बाजूला नंदी स्थापित नाही कारण या स्थानी ज्यावेळी ब्रम्हा विष्णू महेश अनुसया मातेला दीक्षा भिक्षा मागण्यासाठी आले होते त्यावेळी आपली वाहन गरुड नंदी सोबत आणलेले नव्हते त्याचे प्रतिक पडून नंदीविरहित महादेव अशी सोमेश्वर तीर्थाची ख्याती आहे दत्त तेथे अन्नपूर्णा असते या संगीतानुसार या ठिकाणी अन्नपूर्णा मातेचे स्थान आहे याचे वैशिष्ट्य असे की या स्थानी अन्नपूर्णा माता मूळ स्वरूपात म्हणजे अष्टभुजा रूपात आहे अन्नपूर्णा मातेने भगवान दत्तात्रेयांना नित्य भोजन व्यवस्था मी स्वतः करेल असा शब्द दिल्यामुळे या मोठ्या मध्ये अन्नपूर्णा माता विराजित आहे याच कारणाने प्रत्येक महिन्यात पौर्णिमेला जोगवा आरती संपूर्ण पुरणपोळी युक्त कुलाचार व अन्नदान संपन्न केले जाते यापुढील माहिती आपण पुढील लेखात घेणार आहोत.

गुरुदेव दत्त

# प्रभातपुष्प

## षटकोळी माझी

संध्याराणी जयहिंद कोल्हे {काव्यसंध्या}
कळंब जि.धाराशिव मो. 87885 91371

गुरुमहिमा

वर्णावा सदा मुखी
गुरुमहिमा खरा छान
भविष्य सुंदर घडविले
मार्गदर्शन करुन वेळोवेळी
चुकांची केली दुरुस्ती
यशश्री जीवनी मिळविले

गुरुमहिमा मुखी गाता
आनंद अपार होवून
माथा ठेवावा चरणी
वंदावे सर्वदा गुरुजना
लीन होता तयांपुढे
चाले सुंदर लेखणी

# ...क्षण पुन्हा एकदा भेटले !

**ज्योतिर्मय साहित्य**

आजचा दिवस माझ्यासाठी केवळ एका पुस्तक प्रकाशन सोहळ्याचा नव्हता; तर आयुष्यातील जुन्या आठवणींना उजाळा देणारा, मनाला स्पर्श करून जाणारा एक अविस्मरणीय दिवस ठरला.

शब्दमेळ या काव्यसंग्रहाच्या प्रकाशन सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहण्याचा योग आला. साहित्य, कविता आणि संस्कारांनी नटलेल्या या कार्यक्रमात अनेक मान्यवरांची भेट झाली; पण त्यातली एक भेट मनाच्या अगदी खोल कप्प्यात जाऊन विसावली.

माझ्या बालपणीचा जिवलग मित्र स्वप्नील याच्या आई, सौ. पाठक काकू आज या कार्यक्रमाला उपस्थित होत्या.

काकूंना पाहताच काळ अक्षरशः चाळीस वर्षे मागे गेला...

आठवणींची पाने अलगद उलगडू लागली. माझ्या बालपणीच्या वाढदिवसाच्या आठवणी डोळ्यांसमोर तरळू लागल्या. त्या वाढदिवसाच्या आनंदात सहभागी होण्यासाठी सौ. पाठक काकू आल्या होत्या. त्या वेळी ना मोबाईल होते, ना सेल्फी, ना सोशल मीडियावरील आठवणी; पण मनात कोरलेली माणसं मात्र काळाच्या कितीही लाटा आल्या तरी पुसली जात नाहीत.

त्यानंतर जीवनाच्या वाटा बदलत गेल्या. शिक्षण, नोकरी, जबाबदाऱ्या, संसार... प्रत्येकजण आपल्या प्रवासात व्यस्त होत गेला. नकळत संपर्क तुटला. आणि तब्बल पस्तीस वर्षांनंतर आज पुन्हा काकूंची भेट झाली. संपूर्ण कार्यक्रमभर आम्ही एकमेकांकडे पाहात होतो. ''त्याच असतील का?'' माझ्या मनातील प्रश्न तर ''तोच असेल का?'' काकूंच्या मनातील प्रश्न.

कार्यक्रम संपला आम्ही भेटलो, दोघेही एकदाच म्हणालो, स्वप्नील...

क्षणभर वाटले, काळ थांबला आहे...

चेहऱ्यावर काळाच्या रेषा उमटल्या असतील, केस पांढरे झाले असतील; पण आपुलकीचा स्पर्श, प्रेमाची ऊब आणि ओळखीचे हास्य अजूनही तितकेच जिवंत होते.



जीवन आपल्याला अनेक यश, सन्मान आणि पुरस्कार देते; पण काही भेटी अशा असतात की त्या कोणत्याही पुरस्कारापेक्षा अधिक मौल्यवान असतात. आजची ही भेट तशीच होती.

**चन्द्रहास शास्त्री सोनपेठकर**

विशेष म्हणजे, ज्या कार्यक्रमात मी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होतो, त्याच कार्यक्रमाने मला माझ्या बालपणाशी पुन्हा जोडले. एका साहित्यिक कार्यक्रमाने केवळ पुस्तकाचे प्रकाशन केले नाही, तर माझ्या स्मृतींचेही जणू पुनःप्रकाशन केले.

आज पुन्हा एकदा प्रकर्षाने जाणवले

''काळ पुढे जातो, पण माणसांनी दिलेली माया आणि आठवणी कधीच जुन्या होत नाहीत.'' सौ. पाठक काकूंना सप्रेम प्रणाम. त्यांच्या भेटीने आजचा दिवस अधिक समृद्ध झाला. आणि माझा मित्र स्वप्नील, जरी आज प्रत्यक्ष भेटला नाहीस, तरी काकूंच्या भेटीतून आपले बालपण पुन्हा एकदा अनुभवायला मिळाले.

काकू अभिमानाने सांगत होत्या सर्वांना, ''हा माझा मुलगाय.'' ...... डोळे पाणावले. काका, सुप्रिया (स्वप्नीलची लहान बहीण), स्वप्नील यांची आठवण झाली. आम्ही केलेली धमाल आठवली. चार दशकांचे काळाचे अंतर कुठल्या कुठे निघून गेले.

जीवनात काही भेटी नियती घडवते... आणि त्या भेटी आयुष्यभर मनात दरवळत राहतात.

विशेष धन्यवाद,
मा. प्रकाशक संजयजी व्यापारी आणि मा. कवी शिरीषकुमारजी, आपल्यामुळे हा योग जुळून आला.

# शंभरावे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन विशेष ठरणार

## शंभराव्या संमेलनासाठी ९९ एकदिवसीय साहित्य संमेलने


**ज्योतिर्मय साहित्य**

पुणे (एस.स्वप्नील): मराठी साहित्याचा गौरवशाली वारसा जपणारे शंभरावे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन केवळ पुण्यापुरते मर्यादित न ठेवता ते प्रत्येक मराठी भाषिकापर्यंत पोहोचविण्यासाठी महाराष्ट्र साहित्य परिषदेने पुढाकार घेतला आहे. या ऐतिहासिक संमेलनाच्या पूर्वतयारीचा भाग म्हणून देशभरात ९९ एकदिवसीय साहित्य संमेलने आयोजित करण्याचा संकल्प करण्यात आला आहे. या उपक्रमाच्या नियोजनासाठी आणि आयोजकांना मार्गदर्शन करण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. ही माहिती संमेलनाची संयोजक संस्था असलेल्या समर्थ युवा फाऊंडेशनचे विश्वस्त राजेश पांडे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली.

शंभरावे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन २८ ते ३१ जानेवारीदरम्यान सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या शैक्षणिक संकुलात होणार आहे. या संमेलनाची व्याप्ती वाढविण्यासाठी – महाराष्ट्रातील तसेच राज्याबाहेरील विविध शहरांमध्ये ९९ एकदिवसीय संमेलने आयोजित केली जाणार आहेत. समाजातील विविध घटकांच्या साहित्यनिर्मितीला मुख्य प्रवाहात स्थान मिळवून देणे आणि स्थानिक वैशिष्ट्ये जपत प्रत्येक मराठी माणसाला शंभराव्या संमेलनाशी जोडणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

कार्यशाळेचे उद्घाटन पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी आणि डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलपती डॉ.पी.डी. पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी महाराष्ट्र साहित्य परिषदेशी संलग्न शाखांचे प्रतिनिधी, पदाधिकारी आणि सुमारे १७० निमंत्रित सहभागी झाले. एकदिवसीय संमेलनांची रूपरेषा, स्थानिक साहित्यिकांचा सहभाग, कार्यक्रमांचे नियोजन आणि जनसंपर्क वाढविण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष योगेश सोमण यांच्या माहितीनुसार, ही ९९ संमेलने १४ ऑगस्ट ते १५ जानेवारी या कालावधीत होणार आहेत. त्यांचे सविस्तर वेळापत्रक, स्थळे आणि कार्यक्रमांची माहिती टप्प्याटप्याने जाहीर केली जाणार आहे.




# गुरुपौर्णिमा एक प्रेरणा...

**ज्योतिर्मय साहित्य**

जन्म आणि मृत्यु या मधील अंतर म्हणजे जीवन...जन्मापासून उघडलेले डोळे आणि आईवडीलांच्या मातृत्वातून, अविरतसेवेतून उजाडणारी प्रत्येक सुंदर सकाळ जेव्हा आपल्याला पुढे जाण्याची प्रेरणा देत असते तेव्हा प्रत्येक पाऊलागणिक असंख्य गोष्टी आपल्याला शिकायला ही मिळतात,

प्रत्येक ठिकाणी कळतनकळत आपल्याला पुढे जाण्यासाठी कधी सुखावणारी तर कधी दुखावणारी ठेच आपल्याला आनंदही आणि दु:खही देत असते आणि त्याच सुखदुखावर मलम लावून उभं रहायला, सावरायला आणि जगायला शिकवणारी..शाळा, कॉलेज, व्यावसाय, नोकरी व्यतिरिक्त इतरही क्षेत्रात त्या त्या टप्प्यावरिल ✻प्रत्येक व्यक्तीच आपली गुरु असते मग ती व्यक्ती लहान असूदेत किंवा थोर...✻ या जीवनरषेत गुरुच्या रुपाने आपल्याला मिळालेली अमूल्य ठेवच म्हणावी लागेल..





गुरूंच्या उपकारांनी आपले मन कृतज्ञतेने भरून येते, तेव्हा आपल्या तोंडून श्लोक बाहेर पडतो...

गुरुर्ब्रम्हा गुरुर्विष्णु गुरुर्देवो महेश्वरः
गुरु साक्षात परब्रम्ह तस्मै श्री गुरवे नमः
अशा या माझ्या गुरुंना शतकोटी नमन.

**दिपक पवार, चिंधवली.**




## कृतज्ञ मी कृतार्थ मी भगवंत हृदयस्थ आहे

© अपर्णा परांजपे कात्रज पुणे मो.95030 45495



### सनातन

पुढे.....

२. ब्रह्मच सनातन सत्य (तैत्तिरीय उपनिषद् २.१)
सत्यं ज्ञानमनन्तं ब्रह्म।
शंकराचार्य भाष्य करतात—
"त्रिकालाबाधितं सत्यम्।"
अर्थ : जे भूत, वर्तमान आणि भविष्य या तिन्ही काळांत कधीही बाधित होत नाही, तेच सत्य; आणि तेच ब्रह्म. हेच सनातन तत्त्व आहे.

३. जग परिवर्तनशील आहे (भगवद्गीता २.१६)
नासतो विद्यते भावो नाभावो विद्यते सतः।
शंकराचार्य म्हणतात—
"सत् कदापि न व्यभिचरति।"
अर्थ : सत्य कधी बदलत नाही. असत्याला स्थैर्य नसते. त्यामुळे बदलणारे जग व्यवहारात सत्य वाटले तरी ते परमार्थाने सनातन नाही.

४. सनातन धर्म म्हणजे मोक्षमार्ग
गीतेच्या भाष्यात शंकराचार्य वारंवार सांगतात की वेदांनी सांगितलेला धर्म हा चित्तशुद्धीसाठी आहे आणि चित्तशुद्धीतून ब्रह्मज्ञान प्राप्त होते.
"धर्मः चित्तशुद्ध्यर्थम्, ज्ञानं तु मोक्षहेतुः।"
भावार्थ : धर्म मन शुद्ध करण्यासाठी आहे; परंतु मोक्षाचे प्रत्यक्ष कारण ब्रह्मज्ञान आहे.

५. सनातन धर्माचा खरा अर्थ
शंकराचार्यांच्या दृष्टीने सनातन धर्म म्हणजे केवळ बाह्य रूढी, पोशाख, आचार किंवा सामाजिक परंपरा नव्हेत. त्या काळानुसार बदलू शकतात.
सनातन आहेत— वेदांचे अपौरुषेय स्वरूप., ब्रह्माचे नित्य अस्तित्व., आत्म्याचे अमर स्वरूप., कर्मसिद्धांत., पुनर्जन्म., मोक्ष.,ब्रह्मज्ञानाची साधना.
हे तत्त्वज्ञान सर्वकाळ सत्य असल्यामुळे त्याला "सनातन धर्म" म्हणतात.

६. शंकराचार्यांचा अंतिम संदेश
ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या।जीवो ब्रह्मैव नापरः॥
हा केवळ एक प्रसिद्ध वाक्यांश नसून अद्वैत वेदान्ताचा सार आहे. सनातन म्हणजे बाह्य रूपांचा आग्रह नव्हे, तर नित्य ब्रह्मस्वरूपाची अनुभूती. वेद, उपनिषदे, गीता आणि ब्रह्मसूत्र यांच्या आधाराने त्या सत्याची अनुभूती करून घेणे, हाच शंकराचार्यांच्या दृष्टीने सनातन धर्माचा परमोच्च अर्थ आहे.

जय जय रघुवीर समर्थ 🙏
कृतज्ञ मी कृतार्थ मी 🙏




## महावस्त्र नात्यांचं : महावस्त्राचे पदर...

विश्वास देशपांडे, चाळीसगाव, प्रतिक्रियेसाठी : ९४०३७४९९३२

### 'मामा' (माहेरचा समृद्ध दुवा)

'नात्यांचं महावस्त्र' विणताना आपण आतापर्यंत आईची 'मायेची पैठणी', बाबांची 'सह्याद्रीची ढाल', आजीच्या 'संस्कारांची शिदोरी' आणि आजोबांचे 'सुरकुत्यांमधील शहाणपण' अनुभवले. या महावस्त्रात एक अत्यंत हसरा, मनमोकळा आणि प्रेमाचा सुंदर रंग भरणारा पुढचा महत्त्वाचा पदर म्हणजेच 'मामा'! या पदराची झळाळी अत्यंत विलक्षण आणि नजरेत भरणारी असते; कारण हा नात्यांमधील अतिशय महत्त्वाचा, जिव्हाळ्याचा आणि विलोभनीय असा पदर आहे.
'झुक झुक झुक अगीनगाडी... मामाच्या गावाला जाऊया' हे गाणं ज्याला माहिती नाही, असा मराठी माणूस विरळाच!
मामाबद्दलचे प्रेम आणि आदर आपण अगदी लहानपणापासूनच शिकतो. आकाशात दिसणारा चंद्र बाळाला दाखवताना आई त्याला प्रेमाने 'चांदोमामा' म्हणते. तो भलेही आपल्यापासून लाखो मैल दूर असतो, पण त्याच्याशी आपण लहानपणी नकळत कितीतरी गुजगोष्टी करतो! चंद्राची ती शीतल सावली आपण प्रत्यक्ष मामाच्या प्रेमात अनुभवतो. लहान मुलांच्या गोष्टींतही अनेक प्राणी 'मामा' बनून बोलू लागतात; तर खेळांमध्ये 'माझ्या मामाचं पत्र आलं, ते मला सापडलं' अशी सुंदर गाणी असायची. आजच्या काळात पत्रलेखनच बंद झाल्यामुळे आपण अशा अनेक चांगल्या गोष्टींना मुकलो आहोत.




## मुलांसाठी लघु बोधकथा



### बाप आणि मुली

एका गृहस्थाला दोन विवाहित मुली होत्या व त्या दोघीही एकाच गावात राहत होत्या. एका मुलीचे लग्न व्यवसायाने कुंभारकाम करणा-या मुलाशी झाले होते तर दुसरीचे लग्न शेतकरी मुलाशी झाले होते. दोघींचेही संसार अगदी सुखात चालू होते.
एके दिवशी कोणत्यातरी कारणाने त्या दोघीही मुली आपल्या माहेरी परत आल्या तेव्हा वडिलांनी मुलींना विचारले,"तुमचे दोघींचेही कसे काय सुरु आहे? आपल्या संसारात दोघीही सुखी आहात ना." शेतक-याशी लग्न झालेली मुलगी म्हणाली," बाबा मी सर्व दृष्टींनी सुखी आहे. तुम्ही देवभक्त आहात म्हणून तुम्हाला एक सांगते की, माझ्यासाठी एक विनंती देवाकडे करा की यंदा पाऊसकाळ जरा लवकर सुरु होऊ दे म्हणजे आमच्या शेतात भाजीपाला चांगला पिकेल व आम्हाला जरा चांगले उत्पन्न मिळेल." हे ऐकताच कुंभाराकडे लग्न होऊन गेलेली मुलगी म्हणाली," बाबा हिच्या म्हणण्याप्रमाणे तुम्ही देवाची मुळीच प्रार्थना करू नका. उलट तुम्ही देवाला अशी विनंती करा की निदान येता एक महिना तरी पाऊस पाडू नकोस म्हणून. कारण माझ्या धन्याला मडकी पक्की भाजण्यासाठी आवे लावता येतील आणि चांगली भाजलेल्या मडक्यांना बाजारात चांगला भाव मिळून आम्हाला चांगले उत्पन्न मिळेल." दोन मुलींच्या या परस्परविरुद्ध मागण्या ऐकून 'काय करावे' हे कळेनासे होऊन तो गृहस्थ मुलींना म्हणाला," मुलींनो मी तुमच्या दोघींचीही विनंती देवाकडे सांगतो पण यात निर्णय काय घ्यायचा तो देवालाच घेऊ दे."
तात्पर्य – जेव्हा आपल्याच माणसांकडून आपल्याला परस्परविरुद्ध गोष्टी करण्यासाठी गळ घातली जाते तेव्हा कुठलीच गोष्ट न करणे हे हितावह ठरते.


# गुरुपौर्णिमा : आदर आणि कृतज्ञतेचा पवित्र सोहळा




ज्योतिर्मय साहित्य

आषाढ महिन्यातील पौर्णिमेला साजरी केली जाणारी गुरुपौर्णिमा ही आपल्या गुरूंबद्दल आदर, कृतज्ञता आणि श्रद्धा व्यक्त करण्याची पवित्र परंपरा आहे. हा दिवस केवळ शिक्षकांचा गौरव करणारा नसून, ज्ञानाच्या प्रकाशाने जीवन उजळविणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचे स्मरण करण्याचा दिवस आहे. भारतीय संस्कृतीत गुरूला देवापेक्षाही श्रेष्ठ स्थान दिले गेले आहे. ''गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुः गुरुर्देवो महेश्वरः'' या श्लोकातून गुरूचे महत्त्व अधोरेखित होते.

गुरुपौर्णिमा ही महर्षी वेदव्यास यांच्या जयंतीनिमित्त साजरी केली जाते. वेदांचे संकलन, महाभारताची निर्मिती आणि अठरा पुराणांची रचना करणाऱ्या महर्षी व्यासांनी भारतीय ज्ञानपरंपरेला अमूल्य योगदान दिले. त्यामुळे त्यांना आदिगुरू मानले जाते. म्हणूनच गुरुपौर्णिमेला व्यासपौर्णिमाअसेही म्हटले जाते.




गुरू म्हणजे केवळ शाळेतील शिक्षक नव्हेत. अज्ञानाचा अंधार दूर करून ज्ञानाचा प्रकाश दाखवणारी प्रत्येक व्यक्ती गुरू असते. आई-वडील हे मुलाचे पहिले गुरू असतात. त्यानंतर शिक्षक, संत, समाजसुधारक, मार्गदर्शक आणि जीवनात योग्य दिशा दाखवणारे अनेक जण आपल्या आयुष्यात गुरूच्या भूमिकेत असतात. त्यांच्या शिकवणीमुळेच व्यक्तिमत्त्व घडते, विचारांना दिशा मिळते आणि जीवन समृद्ध बनते.

भारतीय इतिहासात गुरू-शिष्य परंपरेची अनेक प्रेरणादायी उदाहरणे आहेत. भगवान श्रीकृष्ण आणि सांदीपनी ऋषी, श्रीराम आणि वसिष्ठ ऋषी, यांचे संबंध आदर्श मानले जातात. या परंपरेत गुरू हा केवळ ज्ञानदाता नसून चारित्र्य घडविणारा, मूल्यांची जपणूक करणारा आणि समाजहिताची प्रेरणा देणारा असतो.

आजच्या विज्ञान-तंत्रज्ञानाच्या युगात माहिती सहज उपलब्ध होते; परंतु योग्य माहितीची निवड, तिचा विवेकपूर्ण उपयोग आणि जीवनमूल्यांची जपणूक शिकवणारा गुरू आवश्यकच असतो. इंटरनेट अनेक प्रश्नांची उत्तरे देऊ शकते, पण योग्य निर्णय घेण्याची बुद्धी, नैतिकता, संवेदनशीलता आणि माणुसकीचे संस्कार गुरूकडूनच मिळतात. त्यामुळे आधुनिक काळातही गुरूचे महत्त्व कमी झालेले नाही, उलट अधिक वाढले आहे.

गुरुपौर्णिमेच्या दिवशी विद्यार्थी आपल्या शिक्षकांना भेटून त्यांचा सत्कार करतात, त्यांचे आशीर्वाद घेतात आणि कृतज्ञता व्यक्त करतात. विविध शैक्षणिक संस्था, आश्रम आणि सांस्कृतिक संघटनांमध्ये व्याख्याने, सत्संग, पूजन आणि सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जातात. हा दिवस केवळ औपचारिक शुभेच्छांचा नसून, गुरूंनी दिलेल्या शिकवणीचे आचरण करण्याचा संकल्प करण्याचा दिवस आहे.

गुरू हा आपल्या जीवनातील दीपस्तंभ असतो. तो अडचणीच्या काळात योग्य मार्ग दाखवतो, आत्मविश्वास वाढवतो आणि यशाच्या शिखरापर्यंत पोहोचण्याची प्रेरणा देतो. गुरूचे ऋण कधीही फेडता येत नाही; मात्र त्यांच्या शिकवणीप्रमाणे प्रामाणिक, कर्तव्यदक्ष आणि सुसंस्कृत जीवन जगणे हीच त्यांच्याप्रती खरी गुरुदक्षिणा ठरते. गुरुपौर्णिमा आपल्याला नम्रता, कृतज्ञता आणि ज्ञानाची उपासना करण्याची प्रेरणा देते. गुरूंचा सन्मान करणे म्हणजे ज्ञानाचा सन्मान करणे होय. आपल्या जीवनाला अर्थ, दिशा आणि प्रकाश देणाऱ्या सर्व गुरूजनांप्रती आदर व्यक्त करून त्यांच्या आदर्शांचे पालन करण्याचा संकल्प आपण या पवित्र दिवशी करू या. हीच आपल्या गुरुसाठी गुरुदक्षिणा ठरेल.

# आपले सण आपले उत्सव गुरुपौर्णिमा

ज्योतिर्मय साहित्य

जन्मानंतर लहानपणीच व्यासांनी आपल्या माते जवळ ज्ञान प्राप्ती साठी दूर देशी जाण्याची परवानगी मागितली. सत्यवती अशी परवानगी देत नव्हती. म्हणून व्यास मुनींनी आपल्या आईला ही खात्री दिली की, ती आठवण काढताच, ते तिच्या जवळ त्वरित येतील. याप्रमाणे व्यासांनी बद्रिका श्रमात जाऊन घोर तपश्चर्या केली. लाखो वेद मंत्र समाधी अवस्थेत श्रवण केले. त्याकाळी इतके वेदमंत्र पाठ करणे आणि ते पुढील पिढीला पर्यंत पोहोचविणे हे काम अवघड होऊ लागले होते. हा काळ द्वापार युगाचा अंतिम टप्पा होता. यानंतर येणारे युग हे कलियुग असणार होते, आणि कलियुगात माणसाची बुद्धी कमी व आयुष्यात थोडे अशी परिस्थिती राहणार होती. वेदांचे लाखो श्लोक एकाच व्यक्ती द्वारे पुढे नेता येतील हे समजणे जरा अवघड झाले असते. म्हणून त्यांनी या वेदांचे वर्गीकरण करून ऋग्वेद यजुर्वेद सामवेद व अथर्ववेद अशी विभागणी केली. हे वेदाचे भाग आपले शिष्य पैल, जेमिनी, वैशंपायन सुमंतु मुनी आणि रोम हर्षण यांना शिकविले.




महर्षी वेद व्यासांनी वेदांचे हे मंत्र कोण्या पुस्तकातून वाचून वर्गीकरण केले नव्हते. तर हे मंत्र कित्येक वर्षाच्या तप साधणे तून एखादा ही मंत्र ऐकू येणे कठीण असताना, यांनी लाखो मंत्र श्रवण केले. हे किती अवघड काम आहे, आणि यासाठी त्यांची तप साधना किती मोठी आहे हे कळते.

असे म्हणतात महर्षी वेदव्यास हे त्रेता युगाच्या शेवटी जन्मले. संपूर्ण द्वापार युग ते जगले व कलि युगाच्या शेवटा पर्यंत ते दिव्य देहानिशी ते असतील.

चिरंजीव व्यास महर्षी

महर्षी वेदव्यास हे आठ चिरंजीवां पैकी एक आहेत.

आपण परंपरेने सात चिरंजीवाचा उल्लेख ऐकतो.

अश्वत्थामा बलिर्व्यासो हनुमांश्च विभीषणः।

कृपः परशुरामश्च सप्तैते चिरजीविनः।।

सप्तैतान् संस्मरेन्नित्यं मार्कण्डेयमथाष्टमम्।

जीवेद्वर्षशतं सोऽपि सर्वव्याधिविवर्जितः

या सात चिरंजीव व्यतिरिक्त मार्कंडेय ऋषी हे चिरंजीव आहेत.

महर्षी वेद व्यास हे प्रत्यक्ष भगवंताचे अंशावतार आहेत. त्यांना चिरंजीव पद हे जन्मतः मिळालेले असून ते कोणीही त्यांना वराच्या रूपात दिल्याचा उल्लेख सापडत नाही. असे म्हणतात चार युगाच्या चौकडी दरम्यान प्रत्येक द्वापार युगात एक व्यास अवतार घेतात. या चार युगाच्या चौकडीत कृष्ण द्वैपायन हे महर्षी वेदव्यास आहेत. ते कलियुगाच्या अंतिम स्थिती पर्यंत यावर राहतील.

व्यासांचा परिवार

महर्षी व्यासांच्या पत्नीचे नाव अरुणी होते त्यांना एक पुत्र झाला तो वैराग्याचा महासागर प्रकांड पंडित, ज्ञानी श्री शुकदेव मुनी होते.

महर्षी वेद व्यास रचित ग्रंथसंपदा

महर्षी वेद व्यासांनी महाकठीण असे वेदांचे वर्गीकरण केले हे वर सांगितलेच आहे. याशिवाय त्यांनी एक लाख श्लोक असलेले महाभारत हे महाकाव्य लिहिले. यात लिपीकाचे काम करणारा कोणी सामान्य माणूस नव्हता तर ते काम प्रत्यक्ष भगवान श्री गणेशांनी केले.

महाभारत लिहीत असताना जेव्हा श्री गणेशांना हे काम करण्याची विनंती केल्या गेली, तेव्हा त्यांनी अट टाकली की, मला तुम्ही सलग सांगत रहा. मध्ये थांबता कामा नये. महर्षी व्यासांनी ही अट स्वीकारली व त्यांनीही श्री गणेशा पुढे एक अट टाकली की, तुम्ही प्रत्येक श्लोक आधी समजून घ्या, मगच लिहा.

आपले सण, आपले उत्सव
मधुकर बोरीकर, पुणे
9403061886

असे म्हणतात महर्षी व्यासांनी महाभारत सांगताना काही कूट श्लोकांची ही रचना केली. या श्लोकांचे वैशिष्ट्य असे होते की, प्रकांड पंडित ज्ञानाचे अग्र असणाऱ्या श्री गणेशाला ही काही काळ या श्लोकावर विचार करावा लागे. एवढ्या वेळात महर्षी व्यास आपली इतर कामे आटोपून घेत. महाभारताची रचना तीन वर्षात पूर्ण झाली असे म्हणतात.

भगवद्गीता

हिंदू धर्माचे सार असणारे आणि आजही जगाला आदर्श असणारी आणि जगाला मार्गदर्शन करणारी कोणत्याही काळात तितकीच अद्यतन असलेली भगवद्गीता ही महाभारताचा एक भाग आहे.

विष्णु सहस्रनाम स्तोत्र

पितामह भिष्माच्या मुखातून आलेले हे स्तोत्र, याचीही रचना महर्षी वेद व्यास यांनी केली आहे.

अठरा पुराणे

लाखो श्लोकांची रचना असलेली ही १८ पुराणे व्यासांनी निर्मित केली. अशी मान्यता आहे.

*ब्रम्हसुत्रे*

महर्षी वेद व्यासांनी ब्रह्म सुत्राचे ही लिखाण केले.

याशिवाय व्यास स्मृती, व्यास गीता, उप पुराणे अशी असंख्य निर्मिती वेद व्यासाची आहे.

ज्ञानाची परिसीमा म्हणजे महर्षी वेदव्यास असे म्हणतात. जगात जितक्या वृत्ती, प्रवृत्ती, स्वभावाची माणसे आहेत, तितकी पात्रे त्यांनी महाभारतात निर्माण केली. त्यामुळेच जगात जे आहे ते महाभारतात आहेच आहे, व महाभारतात जे आहे ते इतर सर्व ग्रंथात तेवढे सापडेल असे नाही, म्हणूनच व्यासोच्छिष्ट जगत्रय आपण व्यासांचे उष्टे खात आहोत असा भाव सर्व सारस्वतांचा राहतो. ज्ञानाचे पीठ असणाऱ्या जागेला म्हणूनच आजही व्यासपीठ म्हणून ओळखल्या जाते.

श्रीक्षेत्र बासर येथे साधना असे म्हणतात महाभारतातील युद्धात झालेली अपरिमित मनुष्य हानी यामुळे महर्षी वेद व्यास उद्विग्न झाले. ते तिथून निघून निजामबाद जिल्ह्यातील बासर या स्थानावर आले. हे गोदावरीच्या तीरावर वसलेले पवित्र स्थान आहे. इथे त्यांनी ज्ञान सरस्वती मातेची स्थापना केली व जवळील डोंगरात एका गुहेत त्यांनी आपली साधना सुरू केली. त्यांना सरस्वती माता प्रसन्न झाली. तेव्हा त्यांनी इच्छा व्यक्त केली की, हे स्थान ज्ञानदानाचे स्थान व्हावे. हे ज्ञानाचे पीठ व्हावे. मातेने यावर तथास्तु म्हणून आशीर्वाद दिला.

ज्ञान सरस्वती मातेच्या मंदिरात आजही शिक्षणाचा श्री गणेशा करण्यासाठी पालक आपल्या मुलांना घेऊन येतात व मातेच्या चरणावर विनम्र होऊन आपल्या पाल्याला ज्ञान प्रदान कर ,अशी विनंती करतात. पाटीवर बालका तर्फे लिहून या अभ्यासाची सुरुवात केल्या जाते.

अलीकडेच येथे एक विद्यापीठाची स्थापना ही झाली आहे. व्यास जयंती गुरू पोर्णिमा म्हणून साजरी केल्या जाते

**

# गुरुदक्षिणा

ज्योतिर्मय साहित्य

मानवी जीवन हे एका अथांग समुद्रासारखे आहे. या समुद्रात प्रवास करताना सुख-दुःखाच्या लाटा येतात, संकटांची वादळे उठतात आणि अनेकदा कोणत्या दिशेला जावे, हेच मानवाला कळेनासे होते. अशा वेळी जो आपल्याला योग्य दिशा दाखवतो, जीवनाची नौका पैलतीरावर नेण्यास मदत करतो, तो म्हणजे गुरु. भारतीय संस्कृतीत गुरुचे स्थान देवापेक्षाही वरचे मानले गेले आहे. संत कबीरांनी म्हटले आहे:

''गुरु गोविंद दोऊ खड़े, काके लागू पांय।

बलिहारी गुरु आपने, गोविंद दियो बताय।।''

म्हणजेच, जर गुरु आणि ईश्वर दोघेही समोर उभे असतील, तर आधी गुरुच्या पाया पडले पाहिजे; कारण ईश्वर दाखवण्याचे, ईश्वराची ओळख करून देण्याचे काम गुरुनेच केले आहे. मानवी आयुष्याला आकार देणारा, योग्य आणि अयोग्य यातला फरक शिकवणारा आणि अंधाराकडून प्रकाशाकडे नेणारा मार्गदर्शक म्हणजे गुरु. जो अज्ञानाचा अंधार दूर करून ज्ञानाचा प्रकाश देतो, त्याला गुरु म्हणतात. जन्माच्या वेळी बाळ पूर्णपणे अबोध असते. त्याला या जगाची, संस्कृतीची आणि मूल्यांची कोणतीही माहिती नसते. अशा वेळी पहिली गुरु म्हणून आई बाळाला स्पर्श, प्रेम आणि भाषेचे ज्ञान देते. त्यानंतर वडील त्याला जगामध्ये कसे वावरावे, ध्येय कसे ठेवावे हे शिकवतात. शिक्षणाचा प्रवास सुरू झाल्यावर शिक्षक आपल्याला अक्षरांची ओळख करून देतात, पुस्तकांमधील विद्या शिकवतात आणि जगाचा विस्तार दाखवतात. परंतु, ज्ञानाचा अर्थ केवळ पुस्तकी माहिती किंवा पदव्या मिळवणे एवढाच मर्यादित नाही. खरा गुरु तो असतो जो आपल्यातील सुप्त गुणांना ओळखतो, आपल्यातील क्षमतांची आपल्याला जाणीव करून देतो आणि बुद्धीला विचारांची योग्य दिशा देतो.

ज्ञानामुळे माणसाच्या दृष्टिकोनात फरक पडतो. अज्ञानी माणूस केवळ स्वतःचा विचार करतो, तर ज्ञानी माणूस समाज, निसर्ग आणि संपूर्ण सृष्टीचा विचार करतो. ज्ञानाच्या या प्रवासात गुरु आपल्याला विवेक शिकवतोकाय स्वीकारावे आणि काय त्यागावे. ज्ञानाची ही शिदोरी आयुष्यभर माणसाच्या पाठीशी राहते. आजचे जग हे आकर्षणांनी आणि मोहांनी भरलेले आहे. विशेषतः तरुण वयात मन भरकटण्याची, वाईट मार्गाला लागण्याची किंवा चुकीचे निर्णय घेण्याची शक्यता खूप जास्त असते. अशा वेळी ''गुरु चांगल्या वाटेवर घेतो'' ही गोष्ट अत्यंत महत्त्वाची ठरते.

योग्य आणि अयोग्य, धर्म आणि अधर्म, सत्य आणि असत्य यांमधील सूक्ष्म फरक गुरु आपल्याला शिकवतो. महाभारत काळात जेव्हा अर्जुन रणांगणावर मोहग्रस्त झाला होता, कर्तव्यापासून पळ काढत होता, तेव्हा श्रीकृष्णाने त्याला भगवद्गीता सांगून चांगल्या आणि धर्माच्या वाटेवर आणले. जर अर्जुनाला कृष्णरूपी गुरु लाभला नसता, तर इतिहासाचे चित्र वेगळे असते. गुरु आपल्याला शिस्त, प्रामाणिकपणा, भूतदया, नम्रता आणि कष्टाचे महत्त्व शिकवतो. चांगल्या वाटेवर चालणे हे सुरुवातीला कठीण वाटू शकते. त्यावर काटे असू शकतात, एकाकीपणा असू शकतो; परंतु ती वाट शेवटी समाधानाकडे आणि प्रगतीकडे जाते. गुरु आपला हात धरून आपल्याला अशा सन्मार्गावर चालायला शिकवतो, जिथे पश्चात्तापाला जागा नसते.

आयुष्याचा रस्ता कधीही सरळ आणि गुळगुळीत नसतो. त्यात चढ-उतार, अपयश, निराशा आणि दुःखाचे खड्डे असतात. जेव्हा सर्व बाजूंनी संकटे घेरतात,




आशेचा एकही किरण दिसत नाही, तेव्हा गुरुचे विचार, त्याचे मार्गदर्शन आणि त्याचा आशीर्वाद आपल्याला धीर देतो. राजा शिवछत्रपतींच्या जीवनाचे उदाहरण आपण पाहिले, तर त्यांच्या बालपणापासून ते स्वराज्य स्थापनेच्या खडतर प्रवासापर्यंत माता जिजाऊ आणि समर्थ रामदास स्वामी यांचे मार्गदर्शन त्यांना लाभले. अनेक कठीण प्रसंगांत, अफाट संकटांना सामोरे जाताना जिजाऊंनी दिलेले संस्कार आणि गुरुंचे मार्गदर्शन यामुळेच छत्रपती शिवाजी महाराज संकटांवर मात करू शकले. गुरु केवळ संकटांचे निवारणच करत नाही, तर संकटांशी कसे लढावे याचे सामर्थ्य आपल्यामध्ये निर्माण करतो. संकटात सापडलेल्या शिष्याला गुरु हा एखाद्या दिव्यासारखा वाट दाखवतो. गुरुचा शब्द, ''घाबरू नकोस, मी तुझ्यासोबत आहे,'' हा विश्वास शिष्याला हजार हत्तींचे बळ देतो. म्हणूनच म्हटले जाते, गुरु आपल्याला संकटांच्या अथांग समुद्रातून सुखरूप तारून नेतो.

मानवी जन्म मिळणे ही अतिशय दुर्मिळ गोष्ट मानली जाते. परंतु, केवळ खाणे, पिणे, झोपणे आणि भौतिक सुख-सुविधा मिळवणे म्हणजेच आयुष्य का? तर नाही. आयुष्याला एक उच्च ध्येय असणे आणि ते ध्येय गाठून जीवनाचे सार्थक करणे हेच मानवी जन्माचे खरे उद्दिष्ट आहे. आपले जीवन फक्त स्वतःपुरते मर्यादित न ठेवता ते इतरांच्या कामी कसे येईल, समाजात प्रेम आणि शांतता कशी पसरवता येईल, याचे ज्ञान गुरु देतो. माणूस जेव्हा यश मिळवतो, तेव्हा त्याच्यात अहंकार निर्माण होण्याची शक्यता असते. गुरु शिष्याला नम्रता शिकवून त्याचा अहंकार गळवून टाकतो. आत्मज्ञानाशिवाय जीवनाचे सार्थक होत नाही. ''मी कोण आहे?'', ''माझ्या जगण्याचा उद्देश काय?'' या अध्यात्मिक प्रश्नांची उत्तरे गुरुच्या सहवासात मिळतात. महाराष्ट्राला संतांची मोठी परंपरा लाभली आहे. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव या सर्व संतांनी गुरुच्या महत्त्वाचे वर्णन केले आहे. स्वामी विवेकानंदांना जेव्हा श्रीरामकृष्ण परमहंस गुरु म्हणून लाभले, तेव्हाच एका नरेंद्रचा स्वामी विवेकानंद झाला आणि त्यांनी संपूर्ण जगाला भारतीय तत्त्वज्ञानाची ओळख करून दिली. जेव्हा माणूस स्वार्थाच्या वर उठून निस्वार्थ भावाने जगायला शिकतो, तेव्हाच त्याच्या जीवनाचे खऱ्या अर्थाने सार्थक होते. आणि हे सार्थक घडवून आणण्याची ताकद फक्त आणि फक्त गुरुमध्ये असते.




आजच्या आधुनिक आणि डिजिटल युगात गुरुची व्याख्या थोडी व्यापक झाली आहे. आज केवळ व्यक्तीच गुरु असते असे नाही; तर पुस्तके, अनुभव, निसर्ग आणि वेळ हेसुद्धा आपले गुरु असू शकतात. झाडांकडून परोपकार, समुद्राकडून विस्तार आणि सूर्याकडून नियमितपणा शिकता येतो. आपल्याला आपल्या चुकांची जाणीव करून देऊन अधिक सक्षम बनवणारे अपयश हेसुद्धा एका गुरुसारखेच असते. आयुष्यात येणारे चांगले-वाईट अनुभव आपल्याला परिपक्व बनवतात.

परंतु, या सर्वांमध्ये एका प्रत्यक्ष जिवंत मार्गदर्शकाचे स्थान अनन्यसाधारण आहे. डिजिटल जगात माहिती मिळणे सोपे झाले आहे, पण त्या माहितीचे ज्ञानात आणि ज्ञानाचे विवेकात रूपांतर करण्यासाठी गुरुचीच गरज भासते. गुरु हे केवळ एक नाव किंवा व्यक्ती नाही, तर ती एक तत्त्वप्रणाली आहे. गुरु म्हणजे ज्ञानाचा अक्षय झरा, गुरु म्हणजे मूल्यांची शाळा आणि गुरु म्हणजे विश्वासाचा भक्कम आधार. गुरु ज्ञान देऊन आपल्या बुद्धीचा विकास करतो, आपल्याला वाईट मार्गापासून दूर ठेवून चांगल्या वाटेवर चालवतो, संकटांच्या काळात आपले ढाल बनून रक्षण करतो आणि शेवटी या नश्वर जीवनाला एक उच्च अर्थ देऊन त्याचे सार्थक करतो. म्हणूनच, गुरुप्रति आदर, श्रद्धा आणि कृतज्ञता व्यक्त करणे हे प्रत्येक मानवाचे आद्य कर्तव्य आहे. गुरुने दाखवलेल्या मार्गावर चालणे, त्यांनी दिलेल्या ज्ञानाचा समाजाच्या कल्याणासाठी वापर करणे हीच गुरुला दिलेली खरी गुरुदक्षिणा ठरेल. गुरुचरणी लीन होऊन आपण नेहमी हाच विचार केला पाहिजे:

''गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुः गुरुर्देवो महेश्वरः।''

''गुरुः साक्षात् परं ब्रह्म तस्मै श्री गुरवे नमः।।''

***

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559